# अनोळखी हा उंबरठा

जपून ठेव ग पाऊल मजघरी अनोळखी हा उंबरठा
स्वर्गलोकांतून अमृत भरुनी आल्या माझ्या गृही घटा.

लाख दीप जणु गृही लागुनी स्वर्णासम ते लखलखले
झगमगत्या या किरणामधुनी रूप तुझे गं मृदू हसले.

ऋणुझुणु  ऋणुझुणु नाद निनादे पदन्यास तव मंगल हा
संगीतमय मम विश्व जाहले मधुर राग हा तुझा नवा.

मनोरथाचे स्वप्न रंगुनी रंग विखुरला नभी नवा
इंद्रधनुष्य नभी बिंबले तव रूपाने इथे नवा.

लुकलुकते जशी मुग्ध चांदणी नभास उजळित रम्य अहा
मांगल्याचे तुझे आगमन इथे प्रगटले स्वप्न पहा.

नांद सुखाने सौभाग्याने आशीर्वाद हा असे तुला
मोठ्या घरची मानाची तू सून स्मरण हे ठेव सदा.

- **अशोक दादा पाटील** (द्वारा, डॉ. सुनील पाटील)

(जयसिंगपूर, जिल्हा कोल्हापूर, महाराष्ट्र)